**१९ संघांचा सहभाग :** उद्या समारोप; शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांचा समावेश

# ‘पुरुषोत्तम करंडक’च्या प्राथमिक फेरीला प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्र कलोपासक मंडळ, गायन समाज देवल क्लब व शिवाजी विद्यापीठाच्या संगीत आणि नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या कोल्हापूर विभागातील प्राथमिक फेरीस रविवारी सुरुवात झाली. पहिल्या दिवशी विविध सात महाविद्यालयांच्या कलाकारांनी एकांकिकांचे सादरीकरण केले. या प्राथमिक फेरीचा उद्या, मंगळवारी समारोप होणार आहे.

## विविध विषयांवरील एकांकिका

- सात संघांनी एकांकिका सादर केल्या. त्यात सकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठ (एकांकिका : तोच चंद्रमा नभात), यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर (कोंबडा), कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज (पाथरवट) या संघांनी, तर सायंकाळच्या सत्रात डीकेटीई इंजिनिअरिंग इचलकरंजी (शिकवण), डी. वाय. पाटील कॉलेज, कसबा बावडा (जंगल), भारती विद्यापीठ अभियांत्रिकी कॉलेज, कोल्हापूर (भोंडला), न्यू कॉलेज (जंगल) यांनी सादरीकरण केले.



- प्रत्येक संघाला सादरीकरणासाठी एक तासाची वेळ आहे. या स्पर्धेमुळे खांडेकर भाषाभवनचा परिसर युवक-युवतींच्या गर्दीने फुलला आहे.

येथील शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये सकाळी १० वाजता या स्पर्धेचे उद्घाटन गायन समाज देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील आणि विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख अंजली निगवेकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी देवल क्लबचे खजिनदार राजेंद्र पित्रे, सुबोध गद्रे, नाट्य विभागप्रमुख उमा नामजोशी, कलोपासक मंडळाचे अध्यक्ष काका निगोजकर, विश्वस्त शंकर उणेचा, अभिषेक भाकरे, आदी उपस्थित होते. देवल क्लबचे उपाध्यक्ष चारुदत्त जोशी यांनी आभार मानले. देवदत्त पाठक, राजन जोशी, मेघना खरे या परीक्षक म्हणून काम पाहत आहेत.

दिवसभरात सात महाविद्यालयांच्या संघांनी एकांकिक सादर केल्या. तीन दिवस चालणाऱ्य या प्राथमिक फेरीमध्ये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १९ संघ सहभागी झाले आहेत. या प्राथमिक फेरीचा समारोप मंगळवारी होईल. सायंकाळी सह वाजता ज्येष्ठ मराठी रंगकर्मी आनं काळे आणि विद्यापीठातील विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानस यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण होणार आहे. पुणे येथे दि. २७ ते २९ डिसेंबरदरम्यान या स्पर्धेची अंतिम फेरी होणार आहे.

लोकमत

# डी. डी. शिंदे सरकार कॉलेजचे यश

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये शहरी गटातून डी. डी. शिंदे सरकार कॉलेजने वाणिज्य शाखेमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. याबद्दल प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे यांचा सत्कार केला.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, सरस्वती शिंदे एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा माधुरी शिंदे, आर. जी. कोरबू, ए. बी. पाटील उपस्थित होते.

# 'पुरुषोत्तम'ची प्राथमिक फेरी सुरू

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

मानाचा समजल्या जाणाऱ्या पुरषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला रविवारी सुरुवात झाली. शिवाजी विद्यापीठातील भाषा भवनाच्या सभागृहात २४ सप्टेंबरपर्यंत स्पर्धा सुरू राहणार असून त्यामध्ये १९ संघ सहभागी झाले आहेत.

पुण्यातील महाराष्ट्रीय कलोपासक, शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र विभाग आणि गायन समाज देवल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने फेरीचे आयोजन केले आहे. कोल्हापूरसह सांगली, सातारा जिल्ह्यातील संघ आहेत. रविवारी सात एकांकिका सादर झाल्या. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने 'तोच चंद्रमा नभात', इस्लामपूरच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालय संघाने 'कोंबडा', तर कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने 'पाथरवट' ही एकांकिका सादर केली. देवदत्ता पाठक, मेघना खरे-भागवत, राजन जोशी यांनी परीक्षक म्हणून काम केले. या फेरीतून तीन संघांची निवड केली जाणार आहे. अंतिम फेरी २७ ते २९ डिसेंबर दरम्यान पुणे येथे होणार आहे.

■ स्पर्धा : पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा, स्थळ : वि. स. खांडेकर भाषा भवन सांस्कृतिक हॉल, शिवाजी विद्यापीठ, वेळ : सकाळी १० वा.

# एकांकिकेचा मंच, ऑफबिट सिनेमे

कोल्हापूर टाइम्स टीम

साहित्य संस्कृती

सध्या निवडणुकीची धामधुम सुरू झाली असली तरी कॉलेज वर्तुळात मानाच्या समजण्यात येणाऱ्या पुरुषोत्तम करंडक या आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेबरोबरच कलामहर्षी बाबूराव पेंटर फिल्म सोसायटीच्यावतीने वेगळे चित्रपट पाहण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे या दोन उपक्रमांच्या निमित्ताने कलारसिकांना नवरात्रीपूर्वीची मेजवानी मिळणार आहे.

कॉलेज वर्तुळात चर्चा आहे ती पुरुषोत्तम करंडकची. या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत कोल्हापूर केंद्रावर ही स्पर्धा सुरू झाली असून मंगळवारपर्यंत शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवन हॉलमध्ये चालणाऱ्या स्पर्धेचे हे नववे वर्ष आहे. पुणे येथील महाराष्ट्रीय कलोपासक संघ, संगीत व नाट्यशास्त्र विभाग, गायन समाज देवल क्लबने संयोजन केले आहे.

बाबूराव पेंटर फिल्म सोसायटीच्यावतीने नेहमी वेगळे सिनेमे दाखवण्यात येतात. त्यानुसार ऑगस्ट महिन्यात पुढे ढकलावे लागलेले दोन सिनेमे आता दाखवले जातील. त्यातील दिग्दर्शक नितीन कक्कर यांनी एका सेनाधिकाऱ्याची मानसिकता दाखवलेला नोटबूक हा सिनेमा २६ सप्टेंबर रोजी दाखवण्यात येणार आहे. दसरा चौकातील शाहू स्मारक भवनमध्ये सायंकाळी साडेसहा वाजता त्याचे आयोजन केले आहे.

# विद्यार्थ्यांना प्लेसमेंट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात संगणकशास्त्र आणि तंत्रज्ञान शाखेच्या अंतिम वर्षात (२०१९-२०२०) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड देशातील अग्रगण्य आयटी इंडस्ट्रीमध्ये झाली. विश्वजित घाटगे व प्रसाद चौधरी यांची परसिस्टंट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत निवड झाली. वृषाली सावंत, हर्षवर्धन पाटील व प्रसाद चौधरी हे पुणे येथील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या कंपनीमार्फत निवडण्यात आले. या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांचे मार्गदर्शन लाभले. संगणक शास्त्र आणि तंत्रज्ञान विभागाच्या समन्वयक डॉ. आर. जे . देशमुख व प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले.

# तर्कनिष्ठ चिकित्सा ढालेंच्या साहित्याचा गुणविशेष

कोल्हापूर टाइम्स टीम

'तर्कनिष्ठ चिकित्सा हा राजा ढाले यांच्या साहित्याचा अत्यंत महत्त्वाचा गुणविशेष आहे. त्यांच्या साहित्याचे समकालीन संदर्भांच्या अनुषंगाने आकलन व अध्ययन करणे गरजेचे आहे,' असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. अनिल सपकाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव परिषद शताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प गुंफताना 'राजा ढाले यांचे मराठी साहित्यातील योगदान' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

डॉ. सपकाळ म्हणाले, 'उपेक्षित, वंचित अशा समाजव्यवस्थेतून पुढे येऊन सामाजिक न्यायासाठी वैचारिक, धार्मिक आणि साहित्यिक अशा विविध पातळ्यांवर राजा ढाले यांनी प्रस्थापितांविरोधात संघर्ष पुकारला. भाषिक आणि सांस्कृतिक व्यवहाराच्या



डॉ. अनिल सपकाळ

दृष्टीने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक कंगोरे आहेत. महानगरीय संवेदनांचे पडघम वाजविणाऱ्या प्रस्थापितांच्या सांस्कृतिक राजकारणाला ढाले यांनी आव्हान दिले. प्रस्थापितांच्या या वाङ्मयीन व्यवहारात होत असलेल्या उपेक्षेमुळे आणि आपले स्थान शोधण्याच्या प्रयत्नात ही सारी बंडखोरी त्यांनी केली.

## डॉ. अनिल सपकाळ यांचे प्रतिपादन

डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी अध्यक्षीय समारोप केला. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. डॉ. जगन कराडे, डॉ. पी. एस. कांबळे, प्रा. विनय कांबळे, प्रा. अमर कांबळे, प्रा. युवराज देवाळे, नामदेव कांबळे यांच्यासह शिक्षक, नागरिक व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठ युवा महोत्सवास प्रारंभ

## ऐतवडे खुर्द येथे तरुणाईच्या अदाकारींना दाद : विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**ऐतवडे खुर्द : वार्ताहर**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऐतवडे खुर्द (ता. वाळवा) येथे ३९ व्या युवा महोत्सवाला श्री वारणा शिक्षण संस्थेच्या वारणा महाविद्यालयात उत्साहात प्रारंभ झाला. यानिमित्ताने अवघा माहोल तरुणाईच्या जल्लोषाने रंगून गेला आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष डॉ. प्रताप पाटील, डॉ. कृष्णात पिंगळे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. डी. आर. मोरे, विद्यापीठ संयोजन समिती, स्थानिक संयोजन समिती यांच्यासह आयोजनातून हा महोत्सव होत आहे.

कलाप्रकार आणि विजेते अनुक्रमे पुढीलप्रमाणे - एकांकिका : डॉ. वसंतदादा महाविद्यालय तासगाव, के.




**ऐतवडे खुर्द : युवा महोत्सवातील लोकनृत्य स्पर्धेतील एक क्षण.**

बी. पी. कॉलेज इस्लामपूर, वसंतदादा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च सांगली. लघुनाटिका : विलिंग्डन, डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय मिरज, नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पेठ. मूकनाट्य : विलिंग्डन, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय सांगलीवाडी, नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पेठ. पथनाट्य : केबीपी इस्लामपूर, बापूजी साळुंखे महाविद्यालय मिरज, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अँड कॉमर्स महाविद्यालय चिखली. लोकनृत्य : वाय. सी. इस्लामपूर, विश्वासराव नाईक आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय शिराळा, आर्टस् अँड कॉमर्स महाविद्यालय चिखली. लोककला : डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय सांगलीवाडी, श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव.

लोकसंगीत वाद्यवृंद : बळवंत कॉलेज विटा, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक सायन्स महाविद्यालय चिखली. समूह गीत : मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगाव, आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज ऑफ पलूस, विश्वासराव नाईक आर्टस्, कॉमर्स अँड बाबा नाईक सायन्स महाविद्यालय शिराळा. वादविवाद : आरआयटी साखराळे, मिरज महाविद्यालय मिरज.

मराठी वक्तृत्व : बाबा नाईक महाविद्यालय शिराळा, चिंतामणराव इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च सांगली, आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज पलूस. हिंदी वक्तृत्व : केआरपी इस्लामपूर, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगाव, वाय. सी. इस्लामपूर. इंग्रजी वक्तृत्व : अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अँड सायन्स महाविद्यालय चिखली, आदर्श महाविद्यालय विटा.

सुगम गायन : बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय कडेगाव, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय उरुण इस्लामपूर, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आष्टा. नकला : मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगाव, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी साखराळे.

पुढारी

# विद्यापीठात पुरुषोत्तम करंडक प्राथमिक फेरीला प्रारंभ

## १९ संघांचा सहभाग; तीन दिवस चालणार फेरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यापीठात पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीस रविवारी प्रारंभ झाला. कोल्हापूरसह सांगली, सातारा जिल्ह्यातील १९ संघ सहभागी झाले असून, २२ ते २४ सप्टेंबरदरम्यान ही फेरी चालणार आहे.

महाराष्ट्रीय कलोपासक पुणे, शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभाग व गायन समाज देवल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी सकाळी संगीत व नाट्यशास्त्र विभाग प्रमुख अंजली निगवेकर, गायन समाज देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्‌घाटन झाले.




प्राथमिक फेरीत रविवारी सात एकांकिका सादर झाल्या. यात शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या संघाने 'तोच चंद्रमा नभात' ही एकांकिका सादर केली. इस्लामपूरच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या संघाने 'कोंबडा' तर कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने 'पाथरवट' ही एकांकिका सादर केली. सायंकाळच्या सत्रामध्ये इचलकरंजीच्या डी. के. टी. अभियांत्रिकी महाविद्यालयाने 'शिकवण', डी. वाय. पाटील महाविद्यालयाने 'जंगल', भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाने 'भोंडला' व न्यू कॉलेजने 'जंगल' या एकांकिका सादर केल्या.

देवदत्त पाठक, मेघना खरे-भागवत, राजन जोशी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. तीन दिवस चालणाऱ्या प्राथमिक फेरीतून तीन संघांची निवड केली जाणार आहे. अंतिम फेरी २७, २८, २९ डिसेंबरला पुणे येथे होणार आहे. यावेळी देवल क्लबचे उपाध्यक्ष चारुदत्त जोशी, कार्यवाह सचिन पुरोहित, खजिनदार राजेंद्र पित्रे, उमा नामजोशी, सुबोध गद्रे, काका निगोजकर, शंकर उणेचा आदी उपस्थित होते.

- **सकाळी १० वा.** पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे उद्‌घाटन. स्थळ : शिवाजी विद्यापीठ, भाषा भवन सांस्कृतिक हॉल. वेळ : १०.०० वाजता.

# तर्कनिष्ठ चिकित्सा राजा ढाले यांच्या साहित्याचा गुणविशेष : डॉ. सपकाळ

**कोल्हापूर (प्रतिनिधी)** : तर्कनिष्ठ चिकित्सा हा राजा ढाले यांच्या साहित्याचा महत्त्वाचा गुणविशेष आहे. त्यांच्या साहित्याचे समकालीन संदर्भाच्या अनुषंगाने आकलन व अध्ययन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. अनिल सपकाळ यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र व मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव परिषद शताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत 'राजा ढाले यांचे मराठी साहित्यातील योगदान' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. महाजन म्हणाले, राजा ढाले यांनी मराठी साहित्यविश्वाला व्यापक स्वरूपाचे योगदान दिले. बंडखोर कार्यकर्ता असूनही कवितेमधील निरागस भाव जपण्याचे त्यांचे भान व कौशल्य वादातीत होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. जगन कराडे, डॉ. पी. एस. कांबळे, प्रा. विनय कांबळे, प्रा. अमर कांबळे उपस्थित होते.



# लक्ष्मी कॉलेजचे होजागिरी नृत्य थिरकणार मुंबईत

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

सातारा येथे एसएनडीटी मुंबई विद्यापीठांतर्गत घेण्यात आलेल्या विभागीय स्पर्धेत तिटवे, ता. राधानगरी येथील शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या होजागिरी नृत्यास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. या संघाची मुंबई येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे. या संघाने स्पर्धेत उत्कृष्ट नृत्य सादर करून रसिकांची वाहवा मिळविली. या संघाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. जगन्नाथ पाटील यांची प्रेरणा मिळाली. प्रशिक्षक म्हणून महेश कांबळे लाभले. प्राचार्य प्रा. संतोष चौगले, प्रा. राहुल कांबळे, प्रा. रोहन पाटील आणि इतर शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# पुरुषोत्तम करंडक प्राथमिक फेरीला प्रारंभ

## १९ संघांचा सहभाग; तीन दिवस चालणार कोल्हापुरातील फेरी



**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : नाट्यक्षेत्रात मानाच्या असणाऱ्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला आज शिवाजी विद्यापीठातील भाषा भवनाच्या सभागृहात सुरवात झाली. यात १९ संघांनी सहभाग घेतला असून, हे सर्व संघ कोल्हापूरसह सांगली, सातारा या जिल्ह्यांतील आहेत. प्राथमिक फेरी २२ ते २४ सप्टेंबर या कालावधीत होणार आहे.

**आज सादर होणाऱ्या एकांकिका** **सकाळचे सत्र :**

- विलिंग्डन महाविद्यालय, सांगली (शिव में बसी मस्जिद)
- विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर (तिलांजली)
- आर.आय.टी. कॉलेज, इस्लामपूर (एक्सपायरी डेट)
- डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स (मस्जिद में गांधी)

**सायंकाळचे सत्र :**

- स्कूल ऑफ नॅनोसायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी, कोल्हापूर (फ्रेंडशिप)
- दत्ताजीराव कदम महाविद्यालय, इचलकरंजी (गेला श्याम्या कुणीकडे)
- डी. वाय. पाटील प्रतिष्ठान, कोल्हापूर (ट्रॅफिक)
- राजमती नेमगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, सांगली (हिरवीन)

महाराष्ट्रीय कलोपासक पुणे, शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र विभाग आणि गायन समाज देवल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने या प्राथमिक फेरीचे आयोजन केले आहे. उद्घाटनाच्या सत्राला संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख अंजली निगवेकर, गायन समाज देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील, उपाध्यक्ष चारुदत्त जोशी, खजिनदार राजेंद्र पित्रे, उमा नामजोशी, सुबोध गद्रे, काका निगोजकर, शंकर उणेचा उपस्थित होते.

प्राथमिक फेरीत आज सात एकांकिका सादर झाल्या. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने 'तोच चंद्रमा नभात' ही एकांकिका सादर केली. इस्लामपूरच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालय संघाने 'कोंबडा' ही एकांकिका सादर केली. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने 'पाथरवट' ही एकांकिका सादर केली. सायंकाळच्या सत्रामध्ये इचलकरंजीच्या डी. के. टी. अभियांत्रिकी महाविद्यालयाने 'शिकवण', डी. वाय. पाटील महाविद्यालयाने 'जंगल', भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाने 'भोंडला' आणि दि न्यू कॉलेजने 'जंगल' या एकांकिका सादर केल्या.

यावेळी देवदत्त पाठक, मेघना खरे-भागवत, राजन जोशी यांनी परीक्षक म्हणून काम केले. तीन दिवस चालणाऱ्या प्राथमिक फेरीतून तीन संघांची निवड केली जाईल. पुरुषोत्तमची अंतिम फेरी २७, २८, २९ डिसेंबरला पुणे येथे होणार आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतर विद्यापीठ विभागीय जलतरण स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपद पटकाविणारा गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयाचा संघ.**

# गोखले महाविद्यालय विजयी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविद्यापीठ विभागीय जलतरण स्पर्धेत गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयाने सलग दुसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. हर्षवर्धन नाईक, राजवर्धन नाईक, अनिकेत काटकर, भारत पाटील, संदीप जांजगे, सौरभ पाटील यांचा संघात समावेश होता. त्यांचा पेट्रन कौन्सिल मेंबर दौलत देसाई यांच्या हस्ते सत्कार झाला. शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, प्रशासनाधिकारी प्रा. डॉ. मंजिरी देसाई-मोरे, प्रभारी प्राचार्य डॉ. पी. के. पाटील, उपप्राचार्य एस. एच. पिसाळ, प्रा. एन. आर. कांबळे, प्रा. भगतसिंग पाटील यांचे संघास प्रोत्साहन मिळाले.